**अत्यंत महत्वाचे /विहीत कालमर्यादा**
**जाहिर सुनावणी दिनांक १३/०६/२०१९**

क्रमांक/जिपना/पंचा/आस्था-१४/२२६८/२०१९
कार्यालय जिल्हा परिषद नागपुर(पंचायत विभाग)
दिनांक :- २२/ ५ /२०१९

प्रति,

गट विकास अधिकारी
पंचायत समिती पारशिंवणी

**विषय** :- मे. मॉयल लिमिटेड, नागपुर क्षेत्र यांचा मे.साटक मॅगनीज माईन या ७७०० टि.पी.ए.(RoM) मॅगनीज ओर खुली खाण प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर सुनावणीबाबत.

**संदर्भ** : उप-प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय म.प्र.नि.मंडळ नागपुर यांचे पत्र जा.क्र./मप्रनि/उप्राकाना-१/८९३/२०१९ दिनांक १३/०५/२०१९

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषगांने, मे. मॉयल लिमिटेड, नागपुर क्षेत्र यांचा मे.साटक मॅगनीज माईन या ७७०० टि.पी.ए(RoM) मॅगनीज ओर खुली खाण प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण संमतीकरिता **पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १३/६/२०१९ रोजी दुपारी १२:०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय साटक तहसिल पारशिवणी जिल्हा नागपुर** येथे होणार आहे. सदर प्रकल्पासबंधी प्रकल्पधारकाकडुन कार्यकारी सारांश (ईग्रंजी व मराठी), EIA, EMP अहवाल व CD संदर्भिय पत्रान्वये प्राप्त झालेले असुन या कार्यालयास अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

सुनावणीचे अनुषगांने मे. मॉयल लिमिटेड, नागपुर क्षेत्र यांचा मे.साटक मॅगनीज माईन या ७७०० टि.पी.ए (RoM) मॅगनीज ओर खुली खाण या प्रस्तावित प्रकल्पाविषयी सदर प्रकल्पाच्या परिसरातील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, सदर प्रकल्पामुळे वा अन्यप्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना,विचार, टिका, टिप्पणी,आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात जाहिर सुणावणी दरम्यान नोदविता येईल.

विषयाकिंत प्रकरणी संदर्भिय विषयाचे अनुषंगाने आपणांस निर्देशीत करण्यात येते की, नियोजीत पर्यावरणविषयक जाहिर सुनावणीची योग्य प्रसिध्दी आपल्या कार्यालयाकडुन तसेच संबंधित ग्रामपंचायतीकडुन करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन कार्यवाहीसाठी निर्देश देण्यात यावेत. संदर्भिय पत्र यासोबत पाठविण्यात येत असुन त्याबाबत सबंधित ग्रामपंचायतीला कळविण्यात येवून केलेल्या कार्यवाहीचा प्रसिध्दी अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा.यास प्रथम प्राधान्य दयावे.करीता माहितीस व यथाशिघ्र कार्यवाहीस अग्रेषित.

सहपत्र :- संदर्भिय पत्राची छायाकिंत प्रत

सही/-
(राजेंद्र एम.भुयार)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.)
जिल्हा परिषद नागपूर

**प्रतिलिपी** :१) मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना माहीतीस सविनस सादर.
३) मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद नागपुर यांना माहितीस तथा उपरोक्त पत्र जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यासबंधाने कार्यवाहीस समादराने सादर.
४) उप-प्रादेशिक अधिकारी, उपप्रादेशिक कार्यालय-१ म.प्र.नि.मंडळ, सिव्हिल लाईन नागपुर यांना विषयाकिंत प्रकरणी माहितीस सविनय सादर.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.)